# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(न)[(28(2)(t)] अन्वये नोंदणीकृत पदवीधर यांची अधिसभेवरील निवडणूक रविवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी, सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत एकूण ७१ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहे. तसेच सदर निवडणुकीची मतमोजणी मंगळवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी, सकाळी ८.०० वा. पासून विद्यापीठ परिसरात होणार आहे.

मतदानाच्या दिवशी उक्त निवडणुकीच्या उमेदवारांना मतदान केंद्रांवर प्रवेश करण्यासाठी व मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडून ओळखपत्र देण्यात येणार आहे.

उमेदवारांचे ओळखपत्र मिळण्यासाठी सर्व संबंधित उमेदवारांनी त्यांचे नजिकच्या काळात काढलेले पासपोर्ट साईज रंगित छायाचित्र निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ ते १४ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत स्वतः किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत जमा करावयाचे आहेत. त्यानंतर संबंधितास विद्यापीठाकडून ओळखपत्र वितरित करण्यात येईल.

त्याचप्रमाणे विविध मतदान केंद्रांवर उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी म्हणून काम करणा-या व्यक्तिसाठी या परिपत्रकास जोडलेल्या नमुन्यानुसार भरुन केंद्राध्यक्षाकडे सादर करावयाचा आहे. परंतु उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून काम करणारी व्यक्ती ही संबंधित मतदार यादीतील मतदार असणे आवश्यक आहे.

तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून काम पाहणा-या प्रतिनिधींसाठीही ओळखपत्र देण्यात येणार असल्यामुळे संबंधित मतदार यादीतील मतदार असलेल्या व्यक्तीच्या नावाची उमेदवार शिफारस करु शकतात (एका उमेदवारासाठी एक प्रतिनिधी याप्रमाणे) अशा प्रतिनिधींचे नजिकच्या काळात काढलेले पासपोर्ट आकाराचे रंगित छायाचित्र दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ ते १६ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत उमेदवारांनी निवडणूक विभागाकडे जमा करावयाचे आहेत. अशा प्रतिनिधींनाच मतमोजणीच्या वेळी प्रवेश देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/७५०
दिनांक : ११/११/२०२२

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

प्रत : सर्व संबंधित उमेदवार.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

निवडणूक - २०२२

मतदान प्रतिनिधीची नेमणूक

**नोंदणीकृत पदवीधर यांची अधिसभेवरील निवडणूक**

वरील निवडणुकीतील उमेदवार (उमेदवाराचे नाव व पत्ता) -------------------------------- यांचा मतदान प्रतिनिधी याद्वारे श्री. / श्रीमती ------------------------------------------ यांची मतदान केंद्र क्रमांक -- ------------------------------- येथे / मतदानासाठी निश्चित केलेली जागा --------------------------- ------- येथे -------------------- वाजता हजर राहण्याकरिता मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :

दिनांक : ------------------------ उमेदवाराचे नाव व सही

मी असा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे कबूल करतो.

ठिकाण :

दिनांक : ------------------------------------ मतदान प्रतिनिधीचे नाव व सही